# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date 13 January 2026
## Time 11.00 to 11.05 AM
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक १३ जानेवारी २०२६ सकाळी ११.०० वाजता

****

सूर्याचं उत्तरायण आणि शेतात कापणीला आलेल्या पिकांच्या आनंदाप्रीत्यर्थ देशात सर्वत्र आज उत्सव साजरा केला जात आहे. महाराष्ट्रात आज भोगीचा उत्साह आहे; तर उद्या संक्रांतीचा सण साजरा होणार आहे. पंजाब, हरियाणा आणि उत्तर प्रदेशातही आज शेकोटी पेटवून, गाणी गात, पारंपारिक पदार्थांचा आस्वाद घेत लोहरीचा सण साजरा केला जातो. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सर्व देशवासियांना लोहरी, मकर संक्रांत, बिहू आणि पोंगलच्या शुभेच्छा दिल्या आहेत. हे सण देशाच्या समृद्ध कृषी परंपरांचे प्रतीक आहेत आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना प्रतिबिंबित करतात, असं त्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

****

राज्यात महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराचा आज शेवटचा दिवस आहे. आज संध्याकाळी साडे पाच वाजता प्रचार संपणार आहे. त्यानंतर १५ जानेवारीला मतदान होईल. मतदान प्रक्रिया शांततेत, पारदर्शकपणे आणि निष्पक्ष होण्यासाठी उद्या आणि परवा पालिकेची भरारी पथके तसंच पोलीस प्रशासनातर्फे कडक बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे.

**

महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने लातूर शहरात बार्शी रोडवरील वाहतूक मार्गात १४ ते १६ जानेवारी दरम्यान बदल करण्यात आला असून, सर्व नागरिकांनी पर्यायी मार्गाचा वापर करण्याचं आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आलं आहे.

दरम्यान, लातूर इथं काल 'स्वीप' उपक्रमाअंतर्गत महानगरपालिका आणि इम्प्रेशन फिटनेस यांच्या संयुक्त विद्यमाने 'झुंबा फॉर डेमोक्रसी' हा विशेष उपक्रम घेण्यात आला. जिल्हा क्रीडा संकुल इथं पार पडलेल्या या उपक्रमात विद्यार्थी, महिला आणि नागरिक सहभागी झाले होते.

****

नाशिकमध्ये तपोवनात अयोध्येच्या धर्तीवर भव्य श्रीराम मंदिर उभारणार असल्याची घोषणा कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनी केली. महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काल घेतलेल्या प्रचारसभेत ते बोलत होते. नाशिकमध्ये होऊ घातलेल्या कुंभमेळ्याच्या निमित्ताने केंद्र आणि राज्य शासनाच्या वतीने हजारो कोटींचा निधी उपलब्ध होणार असून, यामुळे नाशिक शहराचा संपूर्ण कायापालट होणार असल्याचं महाजन यांनी सांगितलं.

****

नाशिक महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षानं ७५ जणांची पक्षातून हकालपट्टी केली आहे. निवडणुकीत पक्षाशी बंडखोरी करून निवडणूक लढवणाऱ्या तसचं उमेदवारी न मिळाल्यानं अन्य पक्षाकडून उमेदवारी मिळवून निवडणूक रिंगणात असलेल्यांचा यात समावेश आहे. यात नाशिक महापालिकेचे माजी सभागृह नेते कमलेश बोडके, सतीश सोनवणे यांच्यासह काही माजी नगरसेवकांचा समावेश आहे.

****

जगभरात निर्माण होत असलेल्या संधींचा लाभ भारतीय युवकांनी घ्यावा, यासाठी केंद्र सरकारकडून कौशल्य विकासाच्या क्षेत्रात सुधारणा केल्या जात असल्याची माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली. नवी दिल्ली इथं सुरु असलेल्या विकसित भारत युवा नेता संवादाच्या समारोप सत्रात ते बोलत होते. विकसित भारत चॅलेंजसाठी ५० लाखांहून अधिक युवांनी नोंदणी केली आणि ३० लाखांहून अधिक युवांनी यात सहभाग घेतला याबद्दल त्यांनी या युवांचं कौतुक केलं.

****

यंदा रब्बी पिकांखालच्या क्षेत्रात चांगली वाढ झाली आहे. नऊ जानेवारीपर्यंत सहा कोटी ४४ लाख हेक्टरच्या वर रब्बीच्या पेरण्या झाल्याची माहिती केंद्रीय कृषी मंत्रालयानं दिली आहे. गेल्या वर्षाच्या तुलनेत ही वाढ १७ लाख हेक्टरपेक्षा जास्त आहे. तीन कोटी ३३ लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रात गहू, तर २१ लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर भातपेरणी झाली आहे. एक कोटी ३६ लाख हेक्टर क्षेत्रात डाळी म्हणजे कडधान्यं, तर ५५ लाख हेक्टरवर तृणधान्यांची लागवड झाली आहे. गळीत, अर्थात तेलबियांच्या लागवडीखालचं क्षेत्र ९६ लाख हेक्टरच्या वर गेलं आहे.

****

औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठीची अंतिम मतदार यादी छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त कार्यालयानं काल प्रसिद्ध केली. यापूर्वी तयार करण्यात आलेल्या प्रारूप मतदार यादीत मुदतीत प्राप्त अर्जांच्या छाननीनंतर ४८ हजार २३४ नावं नव्याने समाविष्ट करण्यात आली आहेत. त्यामुळे अंतिम मतदार यादीत विभागातील एकूण मतदारसंख्या दोन लाख ८८ हजार ७८३ इतकी झाली असून, यामध्ये दोन लाख २१ हजार १६१ पुरुष, ६७ हजार ६०९ महिला आणि तेरा इतर मतदारांचा समावेश आहे.

****

छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी शहरातल्या महात्मा गांधी मिशन विद्यापीठात काल रस्ता सुरक्षा अभियानाचा प्रारंभ केला. वाहन चालवताना रस्ता सुरक्षा नियमांचं पालन करणे, हे प्रत्येकाचं कर्तव्य असल्याचं स्वामी यांनी यावेळी सांगितलं.

****

जालना इथं काल आरोग्य विभागातल्या वरिष्ठ सहायकाला चार हजार रुपये लाच घेतांना रंगेहाथ पकडण्यात आलं. सुनील खंदाडे असं या कर्मचाऱ्याचं नाव असून, तक्रारदाराचं कापलं गेलेलं वेतन मिळवून देण्यासाठी त्याने लाच मागितली होती.

****